M. S. Board Of Secondary And Higher Secondary Education, Mumbai Divisional Board, Vashi, Navi Mumbai-400 703.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, वाशी,नवी मुंबई-४०० ७०३.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

ऑनलाईन परीक्षा

महत्वाचे

क्र मुंविमं/ आय.टी./ जी.के./ ऑनलाईन/३०४/ ५१००

नवी मुंबई-४००७०३.

दिनांक:१८/१२/२०२५

प्रति,

प्राचार्य तथा केंद्रसंचालक,

ऑनलाईन परीक्षा केंद्र

सर्व मान्यताप्राप्त I.T.ची कनिष्ठ महा विद्यालये,

विषय :- फेब्रु/मार्च २०२६ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १२ वी) माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान विषयाच्या ऑनलाईन परीक्षा आयोजनाबाबत.

संदर्भ :- क्र.रा.मं./ ऑनलाईन/ आय.टी /जी.के./३९०६ दिनांक ०७/११/२०२५ चे पत्र

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, माहिती तंत्रज्ञान विषयाच्या ऑनलाईन परीक्षा केंद्राचे केंद्रसंचालक म्हणून आपली नियुक्ती करण्यात आली आहे.

फेब्रु/ मार्च २०२६ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी) ची परीक्षा दिनांक १० फेब्रुवारी २०२६ पासून सुरु होत आहेत. वेळापत्रकाप्रमाणे माहिती तंत्रज्ञान (आयटी) व सामान्यज्ञान (जी.के.) विषयाची ऑनलाईन परीक्षा खालील प्रमाणे राहील.

अ.क्र	विषय	तारखा	वेळ	परीक्षा कालावधी
१)	माहिती तंत्रज्ञान (आय.टी.)	१२ मार्च २०२६ ते १४ मार्च २०२६	सकाळी ११:०० ते ०१:३० दुपारी ०३:०० ते ५:३०	०२ तास ३० मिनिटे
२)	सामान्यज्ञान(जी.के.)	१६ मार्च २०२६ ते १८ मार्च २०२६	सकाळी ११:०० ते ०१:०० दुपारी ०३:०० ते ५:००	०२ तास

सदर बाब सूचना फलकावर लावून सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून त्यांची स्वाक्षरी घेण्यात यावी व त्याची लेखी नोंद आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या दप्तरी ठेवण्यात यावी.

अ) सदर परीक्षेच्या पूर्वतयारीबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. संगणक प्रयोगशाळा व संगणक यंत्रणा परीक्षेसाठी सुसज्ज करण्यात यावी.

२. ऑनलाईन परीक्षेसाठी तांत्रिक सहाय्यक (माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) व सामान्यज्ञान (जी.के.)विषय शकविणारे शिक्षक) या पदावर परीक्षा काळात काम करणा-या व्यक्तींची नियुक्ती आपण करावी.

३. पर्यवेक्षणासाठी (माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) व सामान्यज्ञान (जी.के.) विषय न शिकविणा-या व संगणक चालू करण्याचे Basic ज्ञान असलेल्या)इतर विषयाच्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात यावी.

४. केंद्र संचालक, तांत्रिक सहाय्यक व पर्यवेक्षणासाठी नियुक्त केलेल्या शिक्षकांच्या माहितीचा तक्ता सोबत जोडला असून सदर तक्ता भरून मंडळ कार्यालयात दिनांक २४/०१/२०२६ पर्यंत practicalbr.mumbaiboard@gmail.com या email वर पाठवावा.

५. ज्या कनिष्ठ महाविद्यालयास ''माहिती तंत्रज्ञान'' विषय शिकविण्यास मान्यता दिलेली आहे, अशा सर्व कनिष्ठ महाविद्यालयातच या विषयाची परीक्षा घेण्यात येईल. (माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) व सामान्यज्ञान (जी.के.) विषय घेतलेल्या परीक्षार्थ्यांसाठी फक्त माहिती तंत्रज्ञान विषयासाठी त्यांचेच कनिष्ठ महाविद्यालय हेच परीक्षा केंद्र राहिल) या विषयासाठी विदयार्थ्यांनी त्यांच्या 'लेखी' परीक्षा केंद्रावर न जाता आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात येण्याबाबत संबंधित विद्यार्थ्यांना सूचना देण्यात याव्यात.

६. या परीक्षेसाठी अखंडित विद्युत पुरवठा, दूरध्वनी सेवा व इंटरनेट कनेक्टिव्हिटी आवश्यक आहे. यादृष्टीने आपण आपल्या कार्यक्षेत्रात विभागीय/जिल्हा स्तरावरील संबंधित यंत्रणांशी संपर्क साधून त्यांच्या अखंडित उपलब्धतेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. तसेच स्थानिक विद्युत मंडळ, दूरध्वनी कार्यालय यांना लेखीपत्र देऊन विनंती करावी व त्याचा सातत्याने पाठपुरावा करावा

- **विद्युत पुरवठा खंडित झाल्यास 5 ते 10 मिनिटांत जनरेटर सुरु करुन परीक्षा पूर्व स्थिती पुनर्स्थापित करणे.**

- **इंटरनेट खंडित झाल्यास 5 ते 10 मिनिटांत पर्यायी इंटरनेट जोडणी उपलब्ध करून परीक्षा पूर्व स्थिती पुनर्स्थापित करणे.**

७. माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) विषयाच्या परीक्षा कालावधी ०२.३० तास व सामान्यज्ञान (जी.के.) विषयाच्या परीक्षा कालावधी २.०० तासांचा आहे. यापूर्वी घेतलेल्या या विषयांच्या सर्व सराव परीक्षांचा अनुभव, प्रश्नपत्रिका आराखडयाचे स्वरुप पाहता सर्वसाधारणपणे १.४५ तास ते २ तास कालावधी प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी पुरेसा असल्या आढळून चे आले आहे. मात्र परीक्षेचे तांत्रिक स्वरुप पाहता, संभाव्य तांत्रिक व्यत्ययाचा विचार करुन परीक्षेचा कालावधी उपरोक्तप्रमाणे २.३० तास व २.०० ठेवण्यात आला आहे. यामुळे विद्युत पुरवठा अर्ध्या तासापर्यन्तच्या कालावधीसाठी खंडित

झाला असल्यास परीक्षेचे पुनर्नियोजन करण्याची आवश्यकता राहणार नाही.यापेक्षा जास्त कालावधीसाठी विद्युत पुरवठा खंडित झाला असल्यास परीक्षेचे पुनर्नियोजन करण्यात येईल.या विषयीच्या सूचना सत्र परीक्षा झाल्यानंतर देण्यात येतील. पुनर्परीक्षेच्या वेळी विद्यार्थ्याला पूर्वीच्या परीक्षेच्या वेळी सोडविलेली उत्तरे वाचण्याची व वाटल्यास त्यात सुधारणा/बदल करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच ऑनलाईन परीक्षेसाठी कनिष्ठ महाविदयालयाने ६० विदयार्थी संख्येसाठी १५ संगणकांची आवश्यकता असल्याने त्याप्रमाणात संगणक उपलब्ध करावे.

८. परीक्षा कालावधीत परीक्षा सुरु झाल्यानंतर इंटरनेट कनेक्टिव्हिटीमध्ये व्यत्यय आल्यास विद्यार्थ्यांनी गोंधळून न जाता प्रश्नपत्रिका सोडविण्याचे काम चालू ठेवावे. कनेक्टिव्हिटी उपलब्ध झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी दरम्यानच्या काळात सोडविलेल्या प्रश्नांची उत्तरे सादर करावीत. पेपरची वेळ संपावयाच्या वेळेस कनेक्टिव्हिटी खंडित झाली असेल तर पेपरची वेळ संपताच विद्यार्थ्यांनी दिलेली उत्तरे आपोआप सादर होतील. सबब अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांनी गोंधळून जाण्याचे कारण नाही याबाबत विद्यार्थ्यांना सूचना देण्यात याव्यात

९. दिव्यांग विद्यार्थ्यांना लेखी परीक्षेप्रमाणे प्रति तास २० मिनिटे जादा वेळेची सवलत मान्य राहील व या विद्यार्थ्यांसाठी परीक्षेची वेळ माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) ०३ तास २० मिनिटे व सामान्यज्ञान (जी.के.) विषयासाठी २ तास ४० मिनिटे राहिल.

१०. गणकयंत्र विभागाकडून दिव्यांग विद्यार्थ्यांची माहिती प्राप्त झालेली आहे. या व्यतिरिक्त ऐनवेळेस असे विद्यार्थी परीक्षेसाठी आल्यास त्यांचे बैठक क्रमांक आणि कनिष्ठ महाविद्यालयांचे क्रमांक त्वरित विभागीय तांत्रिक समन्वयकांना कळवावेत जेणेकरुन त्यांच्या परीक्षेचे नियोजन करता येणे शक्य होईल. अशा प्रकरणी त्यांच्याकडून आवश्यक ते प्रमाणपत्र प्राप्त करुन विभागीय मंडळास सादर करावे.

११. जे नियमित सत्राप्रमाणे हजर विदयार्थी तांत्रिक व्यत्यय व अन्य अपरिहार्य कारणांमुळे निर्धारित वेळापत्रानुसार परीक्षा देऊ शकणार नाहीत, त्यांच्यासाठी खास बाब म्हणून सर्व परीक्षा केन्द्रावर माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) व सामान्यज्ञान (जी.के.) या विषयासाठी पुनर्परीक्षेची संधी उपलब्ध करून देण्यात येत असून त्याची माहीती खालील प्रमाणे. सदर पुनर्परीक्षेसाठी कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारण्यात येऊ नये.

अ. क्र.	सूचना	विषय	पुनर्परीक्षे बाबत विभागीय तांत्रिक समन्वयकांना कळविण्याचा दिनांक	पुनर्परिक्षेचा दिनांक	वेळ
१	जे नियमित सत्राप्रमाणे हजर विद्यार्थी तांत्रिक व्यत्यय व अन्य कारणामुळे निर्धारित वेळापत्रकानुसार परीक्षा देऊ शकणार नाही. त्यांच्यासाठी पुनर्परीक्षेची संधी उपलब्ध आहे	आय. टी.	१४/०३/२६ दुस–या सत्रापर्यंत	१६/०३/२६	सकाळी ११ ते १.३० दुपारी ०३ ते ५.३०
		जी. के.	१८/०३/२६ दुस–या सत्रापर्यंत	२०/०३/२०२६	सकाळी ११ ते १.०० दुपारी ०३ ते ५.००

१२. ऑनलाईन परीक्षा मंडळाने निर्धारीत केलेल्या दिनांकापासून पुनर्परीक्षेच्या (Reschedule) दिनांकापर्यंत विद्यार्थ्यांनी इतरत्र (Out of station) कुठेही जावू नये. अशा स्पष्ट लेखी सूचना विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात.

१३ जो विदयार्थी नियोजित सत्रात परीक्षेस उपस्थित राहू शकणार नाही व पुढील सत्रासाठी उपस्थित राहण्याबाबत इच्छा व्यक्त करेल त्या विदयार्थ्याची माहिती कळवितांना त्या विदयार्थ्याचा बैठक क्रमांक, मूळ बॅच क्रमांक व तो कोणत्या सत्रात प्रविष्ठ होऊ इच्छित आहे त्याची माहिती, ज्या परीक्षा सत्रात तो हजर राहणार आहे ते परीक्षा सत्र सुरू हेाण्यापूर्वी किमान १तास आधी विभागीय तांत्रिक समन्वयकांना क. म. ने कळविणे आवश्यक आहे.

१४. सर्वसाधारण परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांना ज्या कारणासाठी गैरमार्गाचा अवलंब करण्याबद्दल शिक्षा बजावली जाते ती कारणे व शिक्षेची तरतूद 'ऑनलाईन' परीक्षेसाठीही लागू राहील. लेखी परीक्षेप्रमाणेच विद्यार्थ्यांना कोणतेही अतिरिक्त साहित्य, तसेच मोबाईल, पेज़र, कॅलक्युलेटर इ. तत्सम इलेक्ट्रॉनिक साहित्य / वस्तू परीक्षेच्या वेळी जवळ बाळगता येणार नाही, अशा स्पष्ट सूचना विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात.

१५. I.T. ऑनलाईन परीक्षेसाठी असलेल्या Examinfo site Allot केल्याप्रमाणे विदयार्थ्याने सत्रनिहाय परीक्षा देणे आवश्यक आहे. प्रयोगशाळेबाहेर विद्यार्थ्यांची सत्रनिहाय बैठकक्रमांक यादी सूचना फलकावर ठळक अक्षरात लावण्यात यावी.कोणताही विदयार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

आ) माहिती तंत्रज्ञान या विषयाच्या ऑनलाईन परीक्षा संचालनाबाबत परीक्षा केंद्र संचालक, पर्यवेक्षक व तांत्रिक सहाय्यक यांच्या नेमणुका, त्यांनी परीक्षा कालावधीत पार पाडावयाची कामे व त्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना :-

(भाग - १)

१.केंद्र (परीक्षा स्थळ)- माहिती तंत्रज्ञान विषय शिकविल्या जाणा-या प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयाची संगणक प्रयोगशाळा हे परीक्षा स्थळ राहिल.त्यास केंद्र म्हणून संबोधण्यात येईल.

२.केंद्रसंचालक - परीक्षा स्थळाच्या कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य किंवा प्राचार्यांनी नामनिर्देश केलेली सक्षम व्यक्ती केंद्रसंचालक म्हणून काम पाहील.

३. पर्यवेक्षक - केंद्रसंचालक इतर विषयाच्या शिक्षकामधून पर्यवेक्षकांच्या नियुक्त्या करतील.

पर्यवेक्षक नियुक्ती - मार्गदर्शक सूत्रे-

(अ) I.T. ऑनलाईन परीक्षेसाठी आपल्याच कनिष्ठ महाविद्यालयातील अन्य विषयाच्या शिक्षकांची पर्यवेक्षक (Invigilator) म्हणून नियुक्ती करावयाची असून त्याचे पर्यवेक्षणाचे केंद्र आपले कनिष्ठ महाविद्यालयच राहिल याची नोंद घेण्यात यावी.

(ब) पर्यवेक्षणासाठी (माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) व सामान्यज्ञान (जी.के.) विषय न शिकविणा-या व संगणक चालू करण्याचे Basic ज्ञान असलेल्या)इतर विषयाच्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात यावी.

(क) पर्यवेक्षक कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर, माध्यमिक शाळेत अथवा महाविद्यालयात माहिती तंत्रज्ञान विषय शिकविणारा नसावा.

(ड) सदर परीक्षा ३ दिवस व ६ सत्रांमध्ये प्रत्येक केंद्रावरील २० ते २५ विद्यार्थ्यांच्या गटाकरीता एक याप्रमाणे योग्य संख्येने पर्यवेक्षकांची नियुक्ती करावी.

४. तांत्रिक सहाय्यक - आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे सदर परीक्षेचे संचालन केले जाणार असल्यामुळे माहिती तंत्रज्ञान विषयांच्या शिक्षकाची तांत्रिक सहाय्यक म्हणून प्रत्येक परीक्षा केंद्रावर नियुक्ती करावी. त्याचा कार्यकाल ऑनलाईन परीक्षेपूर्वी एक दिवस सुरू होऊन परीक्षा संपल्यावर एक दिवसाने संपेल. सदर व्यक्ती कनिष्ठ महाविद्यालयातील माहिती तंत्रज्ञान विषय शिकविणारी असणे अनिवार्य आहे. या कालावधीत तो शिक्षक दुस-या कोणत्याही कनिष्ठ महाविद्यालयामध्ये तांत्रिक सहाय्यक म्हणून नियुक्त केलेला नाही याची खात्री करावी.

५. **संबंधित व्यक्तींना द्यावयाच्या मानधनाचे दर खालीलप्रमाणे असून त्याप्रमाणे त्यांना मानधन देण्याची व्यवस्था करावी.**

१.	केंद्रसंचालक	=	प्रति सत्र रु.५०/- + एकवट मोबदला रु.१६५/-
२.	**पर्यवेक्षक**	=	प्रति सत्र रु.३०/- २० ते २५ विद्यार्थ्यांच्या तुकडीसाठी एक
३.	**तांत्रिक सहाय्यक**	=	प्रति सत्र रु.३०/- (५० विदयार्थ्यापर्यतच्या प्रत्येक गटासाठी, दोन्ही सत्रात उपस्थिती आवश्यक)
४.	**शिपाई**	=	रू १००/- *एकवट मानधन (३००विदयार्थ्यापर्यंत एक)*

(भाग - २)

परीक्षापूर्व तयारी

परीक्षा साहित्य वितरण ऑनलाईन परीक्षेकरीता वापरण्यात येणारे साहित्य -

1. Batch wise Time Table.
२. विद्यार्थ्याची हजेरी दर्शविणारा स्वाक्षरी तक्ता.

उपरोक्त साहित्यामधील क्रमांक १ चे साहित्य राज्य मंडळाकडून तयार केले जाईल व विभागीय मंडळांना वितरित केले जाईल. क्रमांक २ साठी नमुना तक्ता सोबत जोडला आहे. त्यानुसार आवश्यक संख्येने कनिष्ठ महाविद्यालयांनी विदयार्थी हजेरी स्वाक्षरी तक्ते तयार करुन घ्यावेत व त्याचा वापर करावा. तांत्रिक सहाय्यकाने परीक्षा कालावधीत केंद्रावर उपस्थीत असणे आवश्यक आहे. परंतू प्रयोगशाळेत पर्यवेक्षकांनी बोलावल्याशिवाय जाऊ नये

महत्वाचे:- मार्च-२०२४ परीक्षेपासून गोपनीय साहीत्य, तसेच गोपनीय सूचना ऑनलाईन स्वरूपात खालील दिलेल्या संकेतस्थळावर कनिष्ठ महाविद्यालयाच्या स्वतंत्र Login वर उपलब्ध करून देण्यात येतील.

माहीती तंत्रज्ञान(आय.टी.) htpp://examinfo.mh-hsc.ac.in/
सामान्यज्ञान (जी.के.) htpps://gk.mh-hsc.ac.in/
परीक्षेच्या प्रत्येक दिवशी प्रत्येक सत्रापूर्वी करावयाची कामे –

१.तांत्रिक सहाय्यकांनी सत्र वेळेपूर्वी एक तास आधी प्रयोगशाळा सुरु करावी. Internet ची जोडणी करावी, सर्व संगणक सुरळीत चालू आहेत व त्यावरुन Internet शी संपर्क साधता येत आहे याची खात्री करुन घ्यावी.

२.पर्यवेक्षकांनी निर्धारित वेळेपूर्वी किमान एक तास प्रयोगशाळेत हजर रहावे. तसेच केंद्रसंचालकाकडून त्या सत्रासाठी असलेले गोपनीय Login ID व Password प्राप्त करुन घ्यावेत.

३.परीक्षार्थी विद्यार्थ्यांना परीक्षेपूर्वी २० मिनिटे अगोदर प्रयोगशाळेत हजर राहण्यास सांगावे.

(भाग – ३)

केंद्र संचालकांची कर्तव्ये –

१. केंद्रसंचालकांनी प्रत्येक सत्रास प्रत्यक्ष हजर असणे आवश्यक आहे.

२.सहाय्यकांच्या नियुक्त्या करणे.

३.विभागीय मंडळांकडून प्राप्त झालेले साहित्य योग्य व्यक्तींना योग्य वेळेत पोहोचविणे.

४.केंद्राकडून येणारे अहवाल विभागीय मंडळांना पोहोचविणे.

५.परीक्षा संपल्यानंतर वापरलेले व न वापरलेले साहित्य व स्वाक्षरी तक्ते केंद्राकडून प्राप्त करुन घेणे व ते विभागीय मंडळाकडे सुपूर्द करणे

६.बॅचवाईज टाईम–टेबल विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देणे.वीज पुरवठा, दूरध्वनी व इंटरनेट यांच्या सुविधा सुरळीत व अखंडितपणे सुरु आहेत व राहतील याची खात्री करुन घेणे.

७.परीक्षा केंद्रावर कोणताही गैरप्रकार होणार नाही याची दक्षता घेणे.

पर्यवेक्षकांची कर्तव्ये –

१.परीक्षेच्या प्रत्येक सत्रापूर्वी किमान ३० मिनिटे आधी परीक्षा केंद्रावर हजर राहणे.

२.केंद्रसंचालकांकडून त्या सत्रासाठी असलेल्या Login ID व Password प्राप्तकरुन घेणे.

३.विद्यार्थ्यांना बॅचवाइज–टाईम टेबल प्रमाणे प्रयोगशाळेत प्रवेश देणे.

४.विद्यार्थ्यांनी Login फॅार्ममधील माहिती बिनचूक भरली आहे याची खात्री करणे व Login फॉर्मवर Password भरणे. सदर काम परीक्षा सुरु होण्यापूर्वी पूर्ण करावयाचे असून यासाठी गरज भासल्यास तांत्रिक सहाय्यकांची मदत घ्यावी.

५.परीक्षा सुरु झाल्यानंतर सुरळीत पूर्ण होईल याची काळजी घेणे.

(टीप : तांत्रिक सहाय्यक यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यावेळी त्यांना त्यांच्या कर्तव्याविषयी सविस्तर माहिती दिली जाईल. त्यानी इतर नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना त्यानुसार प्रशिक्षण/ मार्गदर्शन द्यावे.)

इ) ऑनलाईन परीक्षेच्या कालावधीमध्ये माहिती तंत्रज्ञान प्रयोगशाळेत संस्थापातळीवर वीज पुरवठा सुरळीत

ठेवण्याबाबत –

ऑनलाईन परीक्षेच्या कालावधीमध्ये माहिती तंत्रज्ञान प्रयोगशाळेत संस्थापातळीवर वीज पुरवठा सुरळीत ठेवण्याकरीता खालील बाबी आपण लक्षात घेणे अत्यंत आवश्यक आहे.

१.ऑनलाईन परीक्षेसाठी अखंडीत वीज पुरवठा चालू ठेवण्याची संपूर्ण जबाबदारी अपरिहार्यपणे आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची राहिल.

२.ज्या ठिकाणी परीक्षेच्या कालावधीत वीजेचे भारनियमन पूर्व नियोजित आहे त्या ठिकाणी परीक्षा सुरु होण्याआधीच पर्यायी व्यवस्थेमार्फत वीज पुरवठा चालू ठेवावा.

३.स्थानिक पातळीवर कोणत्याही कारणास्तव (उदा.लोडशेडींग) वीज पुरवठा खंडीत झाल्यामुळे सदर परीक्षेमध्ये बाधा येवू नये म्हणून परीक्षा सुरु होण्याआधीच पर्यायी वीज पुरवठयाची व्यवस्था कनिष्ठ महाविद्यालयाने (संस्थेने) स्वत: घ्यावी. (उदा. विद्युत जनरेटर व स्टेबीलायझर किंवा इन्व्हर्टर)

४.सदर पर्यायी व्यवस्था ही परीक्षेसाठी वापरल्या जाणा-या प्रयोगशाळेतील आवश्यक असणा-या उपकरणांसाठी वापरण्यांत यावी. त्यासाठी येणारा खर्च आपल्या कनिष्ठ महाविद्यालयानेच (संस्थेने) करावयाचा आहे.

महत्वाचे : 'माहिती तंत्रज्ञान' विषयाची 'ऑनलाईन' पुनर्परीक्षा (RESHEDULE) ही मंडळातर्फे उद्भवणा-या तांत्रिक कारणांसाठीच घेण्यात येते. संस्था पातळीवर येणा-या अडचणींसाठी घेण्यांत येत नाही याची नोंद घ्यावी.परीक्षा काळात वीजपुरवठा, दूरध्वनी व इंटरनेट पुरवठा अव्याहतपणे चालू ठेवण्याकरीता कनिष्ठ महाविद्यालयाने (संस्थेने) स्थानिक पातळीवर व्यवस्था करावी. परीक्षा वेळापत्रकाप्रमाणेच होतील याची नोंद घ्यावी.

(ज्योत्स्ना शिंदे - पवार)
विभागीय सचिव,(प्र.)
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई-४०० ७०३

प्रत माहितीसाठी :-

१.मा.सचिव, राज्यमंडळ, पुणे - ४११ ००५.
२. शिक्षण उपसंचालक, मुंबई.
३. शिक्षणाधिकारी / शिक्षण निरीक्षक.
४. विभागीय तांत्रिक समन्वयक, मुंबई विभागीय मंडळ.
५. लेखाधिकारी, मुंबई विभागीय मंडळ,वाशी,नवी मुंबई.
६. लेखाशाखा, मुंबई विभागीय मंडळ योग्य त्या कार्यवाहीसाठी.
७. १२ वी परीक्षा विभाग शाखाप्रमूख/शाखाधिकारी

कनिष्ठ महाविद्यालय सांकेतिक क्रमांक J- ____.____.____.

कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव-_____

फेब्रु/मार्च२०२ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेतील माहिती तंत्रज्ञान (Information Technology) या विषयाच्या ऑनलाईन परीक्षेकरिता **केंद्रसंचालक/ तांत्रिक सहाय्यक/ पर्यवेक्षक यांची** खालीलप्रमाणे नियुक्ती करण्यात येत आहे.

१. केंद्रसंचालक (Chief Conductor)

Sr. No.	Full Name (Block Capital Letter)	Designation	Mobile No.	Sign.
१.				

२. तांत्रिक सहाय्यक (I.T.Teacher)

Sr. No.	Full Name (Block Capital Letter)	Educational Qualification	Teaching Exp	Mobile No.	Sign.
१.					
२.					
३.					

३. पर्यवेक्षक (Invigilator)

Sr. No.	Full Name (Block Capital Letter)	Educational Qualification	Teaching Exp	Mobile No.	Sign.
१.					
२					
३.					

१.पत्रासोबत प्राप्त झालेल्या कर्तव्ये व मार्गदर्शक सूचनांचे वाचन करुन वरील नियुक्त केलेल्या सर्व संबंधितांनी नोंद घेतली आहे व त्यानुसार कार्यवाही करतील.

२.या परीक्षेसाठी सदर केंद्रावर नियुक्त केलेल्या सर्व संबंधितांचे जवळचे नातेवाईक परीक्षेस प्रविष्ठ झालेले नाहीत.

३. आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे घेतल्या जाणा-या या परीक्षेच्या सुयोग्य संचालनासाठी नियुक्त केलेले सर्व संबंधित गांभिर्यपूर्वक काम करतील.

४. परीक्षेच्या संपूर्ण कालावधीत व परीक्षांचे प्रत्येक सत्र संपेपर्यंत म्हणून केंद्रावर सर्व संबंधित उपस्थित राहतील.

५. परीक्षा केंद्रावर कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल व झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी माझी राहील.

मुख्याध्यापक/प्राचार्य
स्वाक्षरी व शिक्का

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION,
Mumbai Divisional Board, Vashi, Navi Mumbai-400703.
March-२०२६ HSC (12TH) IT & GK ONLINE EXAMINATION

College Name :_____

Index No:_____Subject Name:_____ Subject Code:_____

Seat Nu.(From M _____ to M _____) Date: / /202 Time:_____

Sr.No	Seat Number	Question Paper No.	Student's Signature	Remarks	
				Regular	Reschedule

Supervisor's Name & Sign:_____

Conductor's Sign & Stamp

Note: -This sheet is to be hand delivered by the Institution to Divisional Board at the end of Online Examination latest by_____.